


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३२३, रविवार १५ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# हरणाची तस्करी करणारांना अभय!

## ■ पोलीस आणि वन विभागाचा प्रताप ■ हिवरे कोरडा येथे पकडले होते चार आरोपी

◣ भाळवणी : विशेष प्रतिनिधी

**हिवरे कोरडा येथे हरणाच्या पिलास ताब्यात घेणाऱ्या चार आरोपींना ग्रामस्थांनी पकडून पोलीसांच्या हवाली केल्यानंतरही पोलीस व वन विभागाकडून चारही आरोपींना कोणतीही कारवाई न करता सोडून देण्यात आल्याची धक्कादायक माहीती पुढे आली आहे.**

पारनेर दर्शन FOLLOW UP!



पारनेर तालुक्याच्या अनेक भागांमध्ये वन्य प्राण्यांची तस्करी होत असल्याचे वृत्त पारनेर दर्शनने प्रकाशित करून वन विभाग व पोलीसांकडून त्याकडे कसे दुर्लक्ष होत आहे याकडे लक्ष वेधल्यानंतर अनेक वन्य प्रेमींनी पारनेर दर्शनच्या भुमिकेचे स्वागत केले. दरम्यान, हिवरे कोरडा येथे हरणाचे पिलू पकडणाऱ्या चार जणांबाबत अधिक माहीती घेतल्यानंतर पोलीस हरणाच्या पिलासह चौघांना पारनेर पोलीस ठाण्यात गेले. त्यानंतर हरणाचे पिलू वन विभागाकडे सुपूर्द करून चौघा तस्करांना मात्र सोडून देण्यात आल्याची धक्कादायक माहीती हाती आली आहे.

वास्तविक पोलीसांनी त्या चौघांना वन विभागाच्या ताब्यात देणे अपेक्षीत होते. वन विभागाने त्यांच्यावर वन विभाग अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा दाखल करणे गरजेचे होते. मात्र तसे काही न झाल्याने तस्करांना अभय देण्यामागे नेमका कोणाला रस होता याची सुरस चर्चा सध्या सुरू झाली आहे. वन्य प्राण्यांच्या तस्करीबाबत वन विभाग व पोलीसांमध्ये नेहमीच समन्वयाचा अभाव दिसून येतो, तो हिवरे कोरडा प्रकरणातही दिसून येत आहे. या प्रकरणी वन्य प्रेमी नागरीक वरिष्ठांचे लक्ष वेधणार असून दोषींवर कारवाईची मागणी करणार असल्याचे सांगण्यात आले.

### पिलाच्या शिकारीची भिती

**सुरूवातीचे दोन, तीन महिने पिलू आईच्या दुधावर विसंबून असते. त्यास दोन तीन दिवस दुध न मिळाल्यास अशक्तपणा येउन उपासमारीमुळे त्याचा मृत्यू होऊ शकतो. शिवाय जंगलामध्ये भटकी कुत्री, मांसाहारी प्राणी, पक्षांकडून त्याची शिकरही होऊ शकते.**

### त्या पिलाची आई सापडेल का ?

**वन विभागाच्या ताब्यात देण्यात आलेले हरणाचे पिलू त्याची आई सापडू शकेल का ? सापडल्यास आई त्या पिलाला स्विकारेल का ? हे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून वन्य प्राण्यांच्या रक्षणासाठी वन विभाग ठोस उपयायोजना राबविणार नसेल तर तालुक्यातील वन्य प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची भिती आहे.**

### तर रॅकेटचा पर्दाफाश होईल

**पोलीसांनी हिवरे कोरडा येथे पकडलेले चौघे वन विभागाच्या ताब्यात दिले असते तर या तस्करांनी जंगलांमध्ये यापूर्वी केलेल्या शिकारींची माहीती मिळणे शक्य होते. अशा पिलांना पकडून त्यांची कोठे विक्री करण्यात येते त्या माहीतीवरही प्रकाश पडू शकला असता. अजूनही संबंधितांना ताब्यात घेऊन चौकशी केल्यास बरीच माहिती उजेडात येऊ शकते. तस्करांच्या रॅकेटचा पर्दाफाश होऊ शकतो.**

### तर चांगल्या पध्दतीने काम होईल

**वन विभागाकडून गुन्हा दाखल करण्यासंदर्भातील प्रक्रियेसंदर्भात पोलीसांना अवगत करून तसेच प्राण्यांचे शेडयुल १ ते ४ वर्गवारी, मुद्देमाल व प्राणी ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेची माहीती दिल्यास चांगल्या पध्दतीने काम होऊ शकते.**

**अभिजित रोहोकले**
वन्य जीव अभ्यासक

### प्रशिक्षणाची आवष्यकता

**पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना वन विभागाचा वन्य जीव या विभागाच्या अधिकाऱ्याकडून प्रशिक्षण देऊन वन अधिनियम १९७२ च्या कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यास मदत होईल असा विश्वास वन्य जीव अभ्यासक अभिजित रोहोकले यांनी सांगितले.**

# गीतांजलीताईच्या भेटींमुळे सॉलिसिटरांच्या आठवणींना उजाळा!

## ■ मुंबईस्थित पारनेरकरांनी स्मरण जागविले ■ गीतांजली शेळके गणरायाचरणी नतमस्तक

◣ पनवेल : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्याचे सुपूत्र सॉलिसिटर स्व. गुलाबराव शेळके यांनी ह्यातभर ग्रामीण तरूणांच्या भविष्याच्या उज्वलतेसाठी कार्य केले. त्यांच्या उच्च शिक्षणाच्या सुविधांसाठी प्रयत्न केले. सहकार चळवळीच्या माध्यमातून गरीब आणि गरजू लोकांना आधार दिला. स्व. शेळके यांच्या पश्चात त्यांच्या स्नुषा गीतांजली उदय शेळके यांनी गणेशोत्सवानिमित्त पनवेल व नवी मुंबई परिसरात दिलेल्या भेटींप्रसंगी सॉलिसिटर शेळके साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला गेला.**

सॉ. शेळके यांनी जी.एस. महानगर बँकेच्या माध्यमातून दुष्काळाला कंटाळून मुंबईत आलेल्या हजारो पारनेरकरांना व्यवसायासाठी पतपुरवठा केला. त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम केले. मुंबईस्थित पारनेरकरांच्या भरभराटीत स्व. शेळके यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या या आठवणींना मुंबईकरांनी गीतांजली ताई यांच्या भेटीप्रसंगी उजाळा दिला.

पारनेर तालुक्याचा बराचसा भाग दुष्काळग्रस्त आहे. परिणामी पावसावर अवलंबून असल्याने कित्येक जण उदरनिर्वाहासाठी मुंबईकडे वळाले. त्या ठिकाणी अनेक जणांनी व्यवसायात पाऊल टाकले. त्यांना पाठबळ आणि प्रोत्साहन देण्याचे काम सॉ. गुलाबराव शेळके यांनी केले. आज वाहतूक, मासळी, सी.एच.ए.या उद्योगांमध्ये पारनेरकरांनी गगन भरारी घेतली आहे. जी.एस.महानगर बँकेच्या माध्यमातून शाखांचे विस्तारीकरण करून मोठया प्रमाणात पतपुरवठा उपलब्ध करून देण्याचे काम स्व. शेळके यांनी केले. त्यांच्या पश्चात ॲड. उदयराव शेळके यांनीही सहकार क्षेत्रात आपला प्रभाव पाडला. दुर्देवाने त्यांचेही अकाली निधन झाले. त्यामुळे सर्व जबाबदारी गीतांजली उदय शेळके यांच्या खांद्यावर पडली. त्या जिल्हा सहकारी बँक आणि जी. एस. महानगर बँकेच्या संचालक आहेत. अलिकडेच गीतांजली शेळके यांनी उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनची स्थापना केली असून या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रिडा क्षेत्रात त्यांनी पाऊल टाकले आहे.

गीतांजली शेळके यांच्या भेटींच्या नियोजनासाठी युवा उद्योजक सचिन गोडसे यांनी समन्वय साधून पुढाकार घेतला. यावेळी ज्येष्ठ सहकारी तुकाराम कदम, अमोल बोडके, सुरेश पानमंद यांच्यासह विविध पदाधिकारी, सभसद तसेच मुंबईतील पारनेरकर उपस्थित होते.

### गीतांजलीताईना पाठबळ

**दरम्यान, गीतांजली शेळके यांनी पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील मुंबईस्थित पारनेरकर तसेच जी एस महानगर बँकेच्या सभासदांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. निमित्त होते गणेशोत्सवाचे. या निमित्ताने त्यांनी सर्वांशी विचार विनिमय मरत एकत्रीत रित्या काम करण्याचा संकल्प केला. या निमित्ताने स्व. गुलाबराव शेळके आणि उदय शेळके यांच्या सहकार क्षेत्रातील कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. मुंबईमध्ये पारनेरकरांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचे काम कशा प्रकारे स्व. शेळके यांनी केले, याबाबतच्या स्मृतीसुध्दा अनेकांनी जागविल्या. याची नव्या पिढीला माहिती करून देण्यात आली. त्यांचा वारसा पुढे घेऊन जात असलेल्या गीतांजली शेळके यांच्या पाठीमागे मुंबईकर ठामपणे उभे आहेत अशी ग्वाही या निमित्ताने अनेकांनी दिली.**

### या ठिकाणी दिल्या भेटी

**कळंबोली स्टील चेंबर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, डेरवली, कामोठे, उवले येथील घरगुती गणरायांचे गीतांजली शेळके यांनी दर्शन घेतले. त्यात प्रामुख्याने सुखम हॉस्पिटलचे संचालक डॉ. संतोष जाधव यांचया निवासस्थानी जाऊन शेळके गणरायांच्या चरणी लीन झाल्या.**

# पंतप्रधान सहाय्यता निधीवरही खा. लंके यांचा वरचष्मा !

## तीन रूग्णांना नऊ लाख रूपयांची मदत



◣ पारनेर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीप्रमाणेच पंतप्रधान सहाययता निधीवरही खासदार नीलेश लंके यांचा वरचष्मा असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या शिफारसीवरून नगर दक्षिण मतदारसंघातील तीन रूग्णांना प्रत्येकी तीन लाख रूपयांची मदत मिळाली आहे.**

खा. लंके हे आमदार असताना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून त्यांनी आतापर्यंत शेकडो रूग्णांना मदत मिळवून दिली आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून आजही खा. लंके हे रूग्णांना मिळवून देत आहेत. खा. लंके यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून राज्यात सर्वाधिक रूग्णांना मदत मिळवून दिली आहे. त्याच्या जोडीला आता पंतप्रधान सहाय्यता निधीचीही भर पडली असून जास्तीत जास्त रूग्णांना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी लंके हे प्रयत्नशिल आहेत. गुंडेगांव, ता. नगर येथील नीलेश सुखदेव भापकर, थिटे सांगवी ता. श्रीगोंदे येथील जालिंदर गंगाराम जाधव व टिळक रोड, नगर येथील ऋषीकेश अरूण जाधव या तीन रूग्णांना प्रत्येकी तीन लाख रूपयांची मदत पंतप्रधान सहाय्यता निधीमधून प्राप्त झाली आहे.

खा. लंके यांच्या कार्यालयाकडून तीनही रूग्णांच्या मदतीचे प्रस्ताव एकाच वेळी पाठविण्यात आले होते. ते तीनही प्रस्ताव मंजुर करण्यात आले आहेत. आणखी काही रूग्णांच्या मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले असून त्यांनाही लवकरच मदत मिळेल असे खा. लंके यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### शेवटच्या घटकापर्यंत लक्ष

**तुम्ही किती काम करता यापेक्षा कसे काम करता हे खा. लंके यांच्या या तत्परेतून दिसून येते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लक्ष ठेऊन त्यांना मदत मिळवून देण्यात त्यांची कायम धडपड असते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये लंके यांनी राज्यात अव्वल काम केले. आता पंतप्रधान सहाय्यता निधीमध्येही ते देशात अव्वल असतील.**

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# कांद्याबाबत केंद्राचा निर्णय दिलासा देणारा

## ■ सोयाबीन उत्पादकांनाही फायदा होणार ■ अजित पवारांकडून मोदी, शहांचे आभार

◣ मुंबई : प्रतिनिधी

**देशांतर्गत अन्नधान्य महागाई कमी करण्यासाठी गेल्या वर्षी लागू केलेले बासमती तांदूळ आणि कांद्यावरील किमान निर्यात मूल्य (एमईपी) रद्द करण्याचा मोठा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे देशातील कांदा, बासमती तांदूळ आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत.**

कांद्यासह बासमती तांदळावरील निर्यात मूल्य रद्द करण्याबरोबरच खाद्य तेलावरील आयात शुल्क वाढविण्याची आग्रही मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्यासह केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाकडे सातत्याने केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आहे.



देशांतर्गत अन्नधान्याच्या महागाईला नियंत्रित करण्यासाठी कांदा आणि बासमती तांदळावर निर्यात मूल्य लावले होते. काल (शुक्रवारी) केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात मूल्य हटवले आहे. या निर्णयाचा शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्याचबरोबर खाद्यतेलाच्या आयात शुल्कात मोठी वाढ ◣ उर्वरीत पान ३ वर






# युवा

## लग्नानंतर किती दिवसांनी पती-पत्नी घटस्फोट घेऊ शकतात?

**विवाह ही एक सुंदर गोष्ट आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून दोन व्यक्ती एका सुंदर बंधनात बांधल्या जातात. लग्नानंतर दोघे एकत्र आयुष्य जगू लागतात. पण अनेकदा लग्नानंतर पती-पत्नीमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होतात. दिवसेंदिवस भांडणे वाढू लागतात. पती-पत्नीचे चांगले जमत नाही. हे भांडण इतके वाढतात की प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. जर पती-पत्नी या नात्यामध्ये खुश नसतील तर ते घटस्फोट घेऊ शकतात. लग्नानंतर अनेक गोष्टी घडतात, ज्यामुळे पती-पत्नीला एकमेकांपासून वेगळे व्हायचे असते. अशा स्थितीत फक्त भांडणामुळेच दोघे वेगळे व्हायला हवेत असे नाही. अशा वेळी दोघेही परस्पर संमतीने एकमेकांपासून वेगळे होऊ शकतात. काहींचे लग्न त्यांच्या मना विरुद्ध होते अशा परिस्थितीत तुम्ही किती दिवसात घटस्फोट घेऊ शकता याची माहिती घेऊयात...**

कायद्यानुसार पती-पत्नी एकमेकांना घटस्फोट देऊ शकतात. पण प्रश्न असा आहे की लग्नाच्या अवघ्या एक महिन्यानंतर कोणाला घटस्फोट घ्यायचा असेल तर? अशा परिस्थितीत पती-पत्नीला घटस्फोट घेण्यासाठी किमान 1 वर्ष वाट पाहावी लागेल. खरे तर आता जर पती-पत्नीचे लग्नानंतर चांगले जमत नसेल, तर लग्नाच्या एका आठवड्यानंतरच ते घटस्फोटासाठी अर्ज करू शकतात आणि वेगळे राहू शकतात. पण घटस्फोट मंजूर करण्यापूर्वी न्यायालयाने दोन्ही पक्षांना 6 महिन्यांची मुदत दिली आहे, जेणेकरून त्यांना समेट करायचा असेल तर ते तसे करू शकतात.



### अर्ज कसा करावा

हिंदू विवाह कायदा 1955 अंतर्गत घटस्फोट घेता येतो. परंतु दोन्हीबाबत वेगवेगळ्या कलमांत तरतूद करण्यात आली आहे. घटस्फोटाचा मुद्दा कलम 13 मध्ये नमूद केला आहे, तर न्यायालयीन विभक्ततेबाबतचे नियम कलम 10 मध्ये नमूद केले आहेत. विवाहित जोडपे ज्यांना लग्नानंतर एक वर्षाच्या आत वेगळे व्हायचे आहे. ते विभक्त होण्यासाठी न्यायालयात जाऊ शकते.

### मालमत्तेचे विभाजन


घटस्फोटानंतर संपत्तीचीही विभागणी होते. जर पत्नी कोणतीही नोकरी करत नसेल तर तिला पतीच्या मालमत्तेत हक्क मिळतो. पण जर पत्नी नोकरी करत असेल तर त्याच्याशी संबंधित इतर नियम आहेत ज्यासाठी कायद्याची मदत घ्यावी लागेल.

### घटस्फोट घेणे सोपे नाही

घटस्फोटाचे खरे स्वरूप टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या प्रक्रियेपेक्षा खूप वेगळे आहे. खऱ्या जीवनात घटस्फोट घेणे अजिबात सोपे नाही. तुम्ही कोणत्याही क्षणी भावनिकदृष्ट्या कमकुवत होऊ शकता. म्हणून, आपल्या कुटुंबाशी आणि मित्रांशी जोडलेले राहा. जेणेकरून या कठीण काळात तुम्हाला एकाकीपणा आणि चिंतेतून जावे लागणार नाही.

### तुमचा सहभाग आवश्यक

कोर्टात तुमची बाजू मांडण्यासाठी तुम्ही तुमच्या स्वतःच्या वकिलाची नेमणूक केली असली तरी प्रत्येक छोट्या-छोट्या गोष्टीत सक्रिय राहणे तुमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. यासाठी तुमच्या मनात निर्माण होणारा प्रत्येक प्रश्न तुमच्या वकिलाला विचारा आणि तुम्हाला काही समजत नसेल तर तुम्ही त्यांच्याकडून खुलासाही मागू शकता.



## मिठीचं गणित...



**एक घट्ट मिठी तुमच्या आणि तुमच्या जोडीदारामधील सर्व गैरसमज आणि तक्रारी मिटवण्याची ताकद ठेवून असते. जेव्हा जेव्हा तुम्हाला संधी मिळेल तेव्हा तुमच्या जोडीदाराला एक प्रेमाची घट्ट मिठी आवर्जून मारा. यातून तुमचे त्यांच्यावर किती प्रेम आहे हे देखील दिसून येते. मिठी मारणे ही एक भावनिक आणि सुरक्षित प्रतिक्रिया आहे. तुमचा प्रिय व्यक्ती तुम्हाला घट्ट मिठी मारतो तेव्हा तुम्हाला सुरक्षितता, प्रेम आणि त्याची काळजी त्यातून फील होते. मिठी मारल्याने तुमची नाती मजबूत होतातच, पण त्यामुळे तुमची स्ट्रेस अर्थात ताणतणावाची पातळीही कमी होते. पण या मिठींचे सुद्धा काही छान तर काही गूढ असे अर्थ असतात जे तुम्हाला माहीत असल्यास पार्टनरच्या मनातील भावना ओळखण्यास मदत होऊ शकते...**

- रेस्ट-ऑन-शोल्डर हग : जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला अशा प्रकारे मिठी मारायला आवडत असेल तर तुमच्या नात्यात खूप प्रेम, माया आणि समज आहे. तुम्हाला जोडीदाराची उपस्थिती हवीहवीशी वाटते आणि त्याचा स्पर्श तुम्हाला आनंद देतो आणि तुम्हाला कम्फर्टेबल सुद्धा वाटतो.
- द बॅक हग : मागून मिठी मारून तुमचा पार्टनर तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करत असेल की तो किंवा ती तुम्हाला खूप दिवसांपासून मिस करत आहे. जर तुमचा जोडीदार तुम्हाला नियमितपणे अशी मिठी मारत असेल तर समजून जा की त्याचे तुमच्यावर भयंकर प्रेम आहे. ही मिठी हे देखील दर्शविते की जेव्हा तो मागून कमरेभोवती आपले हात गुंडाळतो तेव्हा त्यातून तो संरक्षण प्रतीत करत असतो.
- ग्रेस ऑन वेस्ट हग : या प्रकारची मिठी हे दर्शविते की तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खूप घट्ट नाते शेअर करता जिथे प्रेम, विश्वास आणि भरपूर प्रणय आहे. तुम्ही आणि तुमच्या जोडीदाराला अधिक जवळ आणणारी ही मिठी आहे. तुमचा जोडीदार तुमच्याशी किती खोलवर जोडला गेला आहे हे या मिठीतून दिसून येते.
- 'नेव्हर लेट यु गो' हग : ही ती मिठी आहे जेव्हा दोन लोक एकमेकांना घट्ट धरून आलिंगन देतात. यावरून दोघांनाही एकमेकांपासून वेगळे होण्याची भीती वाटत असल्याचे दिसून येते. याला डेड लॉक हग असेही म्हणतात. अशा प्रकारे मिठी मारणे हे दृढ वचनबद्धता, विश्वास आणि एकतेचे प्रतीक आहे. जर तुम्ही आणि तुमचा जोडीदार अशा प्रकारे मिठी मारत असाल तर तुम्ही एकमेकांबद्दल सिरीयस आहात हे कळते.
- वन आर्म हग : या मिठीशी दोन अर्थ जोडलेले आहेत. प्रथमतः ही मिठी फ्रेंड-झोन दर्शवते आणि दुसरा अर्थ असा की तुमच्या जोडीदाराला सार्वजनिक ठिकाणी कपल म्हणून तुमच्याकडे पाहिले जाऊ नये अशी इच्छा असते. या प्रकारची मिठी अर्धी मिठी मानली जाते, ज्यामध्ये फक्त एकच व्यक्ती आपल्या जोडीदाराभोवती हात ठेवते. लग्नाआधी जर एखादा मुलगा किंवा मुलगी अशी मिठी मारत असेल तर सावध व्हावे. कदाचित पुढे जाऊन तुमची फसवणूक होऊ शकते. कदाचित पुढे जाऊन ती अथवा तो प्रेम आहे हे मान्य करण्यास नकार देऊ शकतात.

## लग्न होत नसेल तर...



**जर तुम्हीदेखील मुलीचे लग्न कधी होणार या समस्याने हैराण असाल तर काळजी करण्याची गरज नाही. कारण या परिस्थितीतून जाणारे तुम्ही एकटे नाहीत. पण भारतात, या परिस्थितीमुळे पालकांना तणावग्रस्त होणे सामान्य आहे. कारण आजच्या आधुनिक काळातही, मुलीचे वयाच्या एक वर्षाच्या आत लग्न करणे समाजात मान्य केले जाते. तसे झाले नाही तर विविध प्रकारचे प्रश्न, टोमण्यांना समोरे जावे लागते. मात्र, या सगळ्याची काळजी करून काहीच मिळणार नाही. तुमच्याही मुलीचे किंवा जवळच्या व्यक्तीचे लग्न ठरत नसेल तर तिला हे प्रश्न नक्की विचारा...**

- नक्की लग्न करायचे आहे का? : तुम्हाला नक्की लग्न करायचे आहे का? हा एक प्रश्न आहे जो बहुतेक पालक विचारणे आवश्यक मानत नाहीत. परंतु सत्य हे आहे की ते विचारणे सर्वात महत्वाचे आहे. असे




होऊ शकते की तुमच्या मुलीला करिअरमध्ये काहीतरी साध्य करायचे आहे, तिला तिचे नाव मोठे करायचे असेल किंवा तिचा लग्नावर विश्वास नाही. पण हे सर्व तेव्हाच समजेल जेव्हा तुम्ही त्याच्याशी याबद्दल बोलाल. त्यामुळे मुलीचे लग्न करण्याआधी त्यांना हा प्रश्न नक्की विचारा.
- तुम्हाला दुसरे कोणी आवडते का? : भारतात मुली सहसा त्यांच्या पालकांना अशा कोणत्याही अनुभवाविषयी सांगत नाहीत. ज्यामुळे एकतर त्यांना तणावात टाकले जाते. यामुळे मुली सगळ्यांपासून गुपचूप रिलेशनशिपमध्ये राहतात. हे शक्य आहे की तुमची मुलगी देखील एखाद्याशी गंभीर नात्यात आहे आणि तिला त्याच्यासोबत सेटल व्हायचे आहे. त्यामुळे त्याच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करा की तो दुसऱ्याला आवडतो का? पण लक्षात घ्या ही गोष्ट लक्षात घ्या की या संदर्भात तुम्हाला खूपच शांतपणे बोलायचे आहे.
- तुमच्या काही अटी आहेत का? : अनेकदा असे दिसून येते की, अरेंज्ड मॅरेजमध्ये पालक मुलाच्या दिसण्यापासून ते नोकरी आणि कुटुंबापर्यंत सर्व माहिती तपासतात, पण मुलीला काय हवे आहे ही गोष्ट विचारत नाहीत. साधारणपणे असा समज असतो की मुलींना दुसऱ्याच्या घरी जुळवून घेण्यासाठी काही त्याग करावा लागतो, पण सत्य हे आहे की अशी परिस्थिती पूर्णपणे टाळता येते. तुमच्या मुलीला विचारा की तिला कोणत्या प्रकारचा मुलगा आणि कुटुंब हवे आहे, जो तिच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि स्वप्नांशी मिळून जळून घेणारा जोडीदार मिळणे गरजेचे असते.

### भूतकाळाच्या खूणा

अनेकवेळा नात्यात असे काही घडते, ज्याची हृदयावर खोलवर छाप पडते. यामुळे बरेच लोक प्रेम आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या नात्यापासून दूर जातात. तुमच्या मुलीशी मोकळेपणाने बोला आणि तिच्यासोबतही असेच काही घडले आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. ती जे काही उत्तर देईल, ते मोठ्या मनाने स्वीकारा आणि जर तुम्हाला वाटत असेल की तिला अशा भावनिक नुकसानातून बाहेर पडण्यासाठी तज्ञांची मदत हवी असेल तर ते देखील घेण्यास अजिबात संकोच करू नका.

## मित्र सतत उधार मागतात?



**असे म्हणतात की लक्ष्मी आणि कुबेर वगळता जगातील प्रत्येकाला पैशाची गरज असते. प्रत्येकाला जीवनात कधी ना कधी अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो, जेव्हा त्याला अतिरिक्त पैशांची गरज भासते. कठीण काळात आपल्याला फक्त आपले मित्र आणि नातेवाईक आठवतात. अशा वेळी प्रियजनांना मदत करण्यात काही गैर नाही. तथापि, हे देखील खरे आहे की नात्यानात्या मधील पैशाची देवाणघेवाण कटुतेचे कारण बनू शकते. विशेषतः अशी प्रकरणे तेव्हा घडतात जेव्हा एखादी व्यक्ती गरजेपोटी नव्हे तर त्याचा छंद पूर्ण करण्याच्या नादात किंवा त्याच्या निष्काळजी वृत्तीमुळे आर्थिक संकटात सापडते. अशा लोकांसाठी पैसे परत करणे कठीण असते. कारण त्यांना मनी मॅनेजमेंट कसे करावे हेच माहित नसते. तुमच्या आजूबाजूला असे काही नातेवाईक किंवा जवळच्या व्यक्ती असतील ज्या वारंवार उधार मागत असतील तर आज या लेखातून आम्ही तुम्हाला काही पद्धती सांगतोय ज्या सततच्या त्रासातून बाहेर पडण्यास तुम्हाला मदत करू शकतात...**

- सरळ नाही म्हणा : विनाकारण सर्वांकडून कर्ज मागत फिरणाऱ्या लोकांची कमी नाही. ते त्यांच्या मित्र आणि नातेवाईकांकडून पैसे घेतात आणि ते वेळेवर परत करत नाहीत. जर त्यांनी तुमच्या सोबत अनेकदा असे केले असेल, तर स्पष्टपणे नकार देण्यास अजिबात संकोच करू नका, अन्यथा त्यांना उधारी देऊन देऊन, तुमच्यावर उधारी मागण्याची वेळ येईल.
- तुमच्या गरजांबद्दल सांगा : जर तुम्हाला माहित असेल की एखाद्या नातेवाईक किंवा मित्राला उधारी मागण्याची सवय लागली आहे आणि तो ही उधारी त्याचे छंद पूर्ण करण्यासाठी मागत असेल तर तुम्ही तुमच्या गरजा त्याला समजावून सांगायला हवा आणि सतत उधारी देणे तुम्हाला शक्य नाही हे त्याला सांगायला हवे. तुमच्या खर्चाबद्दल त्याला मनमोकळेपाने सांगा. तुम्ही तुमच्या बचतीतून वारंवार पैसे दिल्यास तुम्हाला कोणत्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागेल ते देखील सांगा. यामुळे कदाचित तो पुन्हा तुमच्याकडे उधारी मागणार नाही.
- समोरचा गरीब बनत असेल तर तुम्ही डबल गरीब व्हा : जर तुमच्या समोरची व्यक्ती तुम्हाला इमोशनल भावनेने फसवत असेल आणि तुम्हाला प्रत्येक वेळी पैसे द्यायला लावत असेल तर तुम्ही त्याच्या पेक्षाही तुमची अवस्था दयनीय आहे हे दाखवायला सुरुवात केली पाहिजे. उदाहरणार्थ, जर तो म्हणाला, माझ्याकडे घालायला कपडेही नाहीत, तर तुम्ही असेही म्हणावे की माझं पण असंच आहे. मी स्वतः 4 वर्षे जुने कपडे परिधान करत आहे.



- मी स्वतःच उधारीवर जगतोय : समोरचा जर तुमच्याकडे उधारी मागण्यास अजिबात कचरत नसेल तर तुम्ही देखील जरा हुशार होऊन तुम्ही स्वतःच त्याच्याकडे उधारी मागावी वा त्याला दाखवावे की तुम्हीच उधारीवर जगत आहात. उदाहरणार्थ, तुम्ही असे म्हणू शकता की माझ्याकडचेच पैसे संपले आहेत आणि मीच माझ्या मित्राकडून किंवा ऑफिस मधल्या सहकाऱ्याकडून उधारी घेतली आहे.
- हे कारण सुद्धा चांगले आहे : तुम्ही पैसे मागणाऱ्या व्यक्तीला तुमचा पैसा तुमच्याकडेच नसतो हे सांगू शकता. तुम्ही त्याला कारण देऊ शकता की तुमचा सगळं पैसा हा तुमच्या आई वडिलांकडे किंवा बायकोकडे असतो आणि तुम्हालाच तुमचे पैसे वापरता येत नाहीत. त्यामुळे उधारी मी देऊ शकत नाही असे तुम्ही स्पष्ट सांगू शकता.
- उलट त्याच्याकडूनच पैसे मागा : जर एखादा मित्र किंवा नातेवाईक गरजू असेल आणि तो तुमचे पैसे वेळेवर परत करेल, तर त्याला नक्कीच पैसे द्या, परंतु जर कोणी त्याचा छंद पूर्ण करण्यासाठी किंवा त्याच्या सवयीमुळे पुन्हा पुन्हा पैसे मागितले तर त्याच्यावर ही युक्ती वापरा. त्याने तुमच्याकडून पैसे मागण्याचे वातावरण निर्माण करण्यापूर्वी तुम्ही त्याच्याकडे पैशाची मदत मागावी. तुमची गरज नसली तरी अशा लोकांसमोर खोटे पैसे मागून तुम्ही स्वतःला कठीण परिस्थितीत अडकण्यापासून वाचवाल.

### हो म्हणण्याआधी हे ४ प्रश्न विचारा...

1 कमाई आणि खर्च किती आहे? : नात्यात पैशाबद्दल बोलणे चांगले नाही असे अनेक जण मानतात. परंतु विश्वास ठेवा, सध्याच्या काळात पैसा खूप महत्वाचा आहे. लग्नानंतर या विषयावर बोलून नात्यात कटुता निर्माण करण्यापेक्षा लग्नाआधी या विषयावर मनमोकळेपणाने आणि अर्थपूर्ण संवाद साधलेला बरा. तुमचा खर्च आणि बचत करण्याच्या सवयी किती समान आहेत हे तुम्हा दोघांनाही जाणवेल. लग्नापूर्वी या सवयींवर चर्चा केल्यास भविष्यात पैशांवरून मोठे भांडण होण्याची शक्यता टाळता येईल.

2 मुल हवं की नको? : आता पूर्वीची पिढी राहिलेली नाही, ना तेव्हाची परिस्थिती राहिली आहे. आजकाल जोडपी लग्नाआधीच याविषयी उघडपणे बोलतात. त्यांना बाळ हवे आहे का? जर होय, तर किती वर्षांनी? तम्ही तमच्या भावी जोडीदाराशीही याविषयी बोलले पाहिजे, जेणेकरून उद्या कौटुंबिक दबाव आला तर तुमच्या दोघांमध्ये या विषयावर भांडण होणार नाही.



मुलांबाबत तुमच्यामध्ये जो काही करार झाला असेल, गरज भासल्यास त्याबाबत दोन्ही कुटुंबांना त्याची माहिती द्या, ज्यामुळे तुमचा संसार शांत राहील. अनेकदा दोघांपैकी एकाला बाळ हवं असतं तर दुस-याला जबाबदारी घ्यायची नसते अशावेळी मतभेद होतात त्यामुळे आधीच काळजी घ्या.

3 लग्नानंतर आई वडिलांसोबत राहणार की वेगळे? : लग्नाआधी तुम्ही हे सुनिश्चित केले पाहिजे की तुम्ही दोघेही आपल्या आई वडिलांसोबत राहणार आहात की एकटे? यामुळे तुम्ही दोघेही मानसिकदृष्ट्या तयार व्हाल. लग्नानंतर आई-वडिलांसोबत तुम्ही राहत नसलात तरी आई-वडिलांना आर्थिक पाठबळ देण्याची जबाबदारी तुमची आहे का, यावरही चर्चा व्हायला हवी. जरी या सर्व अतिशय वैयक्तिक आणि नाजूक गोष्टी असल्या तरी त्यावर चर्चा करणे भविष्यासाठी चांगले असेल.

4 दोघांचे करियर गोल काय आहेत? : अनेक नोकरी करणाऱ्या मुली लग्नानंतर नोकरी सोडतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराशी बोलले पाहिजे की तुम्हाला दुसऱ्या शहरात किंवा देशात चांगली नोकरी मिळाली तर त्यालाही तुमच्यासोबत जायला आवडेल का? की तुम्ही दोघेही दोन वेगवेगळ्या शहरात राहाल आणि काम कराल? या सर्व मुद्द्यांवर लग्नाआधी एकमत व्हायला हवे, अन्यथा लग्नानंतर करिअरवरून तणाव अनेकदा नात्यात दिसून येतो.

## शॉर्ट न्यूज

### शासनाच्या विविध योजनांचा लाभ द्या

■ **नगर :** ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ द्यावा, तसेच कामगार कल्याण विभागांतर्गत विमा योजनेत त्यांचा समावेश करण्याबाबत माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ऊसतोड कामगारांच्या संदर्भात आयोजित बैठकीत दिले. अपघाती मृत्यू झालेल्या दोन ऊसतोड कामगारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाखांचे आर्थिक सहाय्य देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

### घोडेगावात कांदा ४२०० रुपयांपर्यंत

■ **नेवासा :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार घोडेगाव येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याची ३५ हजार ३४६ गोण्या आवक झाली. फुल गोळा मालामध्ये एक नंबरला ४१०० ते ४२०० रुपये, दोन नंबर मोठ्या कांद्याला ३८०० ते ३९०० रुपये, तीन नंबर मीडियम मोठ्या कांद्याला ३७०० ते ३८०० रुपये, गोल्टी ३२०० ते ३४०० रुपये, गोल्टा ३५०० ते ३८०० रुपये तर कमी कलरच्या कांद्याला १००० ते २००० रुपये भाव मिळाला. अपवादात्मक भाव ४२०० ते ४३०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

### पारदर्शकता आणण्याची क्रांतिसेनेची मागणी

■ **राहुरी :** रोजगार हमी योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी या योजनेचे अर्ज महाडीबीटीच्या धर्तीवर ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याची मागणी अखिल भारतीय क्रांतिसेनेच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली यासंदर्भात राहुरीचे नायब तहसीलदार सचिन औटी तसेच गटविकास अधिकारी वैभव शिंदे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले, मी समृध्द तर गाव समृध्द आणि गाव समृध्द तर महाराष्ट्र समृध्द करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांसाठी विविध योजना राबविण्यात येतात.

### अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवले

■ **केडगाव :** कपडे शिवण्यासाठी टेलर कडे जाते असे सांगून घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना केडगाव उपनगरात घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादी वरून कोतवाली पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी, त्यांची अल्पवयीन मुलगी व मोठी मुलगी मंगळवारी सकाळी घरात होते. त्यावेळी अल्पवयीन मुलगी मी टेलर कडे कपडे शिवण्यासाठी जाते असे सांगून घराबाहेर पडली. पावणे नऊच्या सुमारास फिर्यादीही कामावर निघून गेले.

### कबड्डी स्पर्धेत काकडे विद्यालयाचे यश

■ **शेवगाव :** शालेय तालुकास्तरीय १७ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेमध्ये अंतिम सामन्यातआबासाहेब काकडे विद्यालयाने त्रिमूर्ती विद्यालयाला पराभूत करत विजय संपादन केला आहे. या स्पर्धा शहरातील त्रिमूर्ती विद्यालयामध्ये नुकत्याच पार पडल्या आहेत. नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती विद्यालयात जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी या संघाची निवड करण्यात आली आहे. मुलांच्या कबड्डी स्पर्धेमध्ये ८ संघ सहभागी झाले होते. काकडे विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेमध्ये खेळाडू सहभागी झाले होते.

# कांदा व बासमतीचे किमान निर्यात मूल्य काढल्याने शेतकऱ्यांना दिलासा

■ मंत्री विखे पाटील यांनी मानले पंतप्रधान मोदींचे आभार
■ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय

लोणी प्रवरा : प्रतिनिधी



**देशासह महाराष्ट्रातील लाखो कांदा व बासमती तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केंद्र सरकारने किमान निर्यात मूल्यावर (एमईपी) असलेल्या अटी रद्द केल्या आहेत. यामुळे शेतकरी कोणत्याही प्रकारचे शुल्क न देता कांदा व बासमती तांदूळ निर्यात करू शकतील. शेतकरी हिताचा निर्णय घेतल्याबद्दल महसूल तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांचे आभार मानले आहेत.**

महाराष्ट्रात मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कांद्याचे तर कोंकण व पूर्व विदर्भात बासमती व इतर तांदळाच्या वाणाचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे हित साधले जाणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

**कांदा उत्पादकांचे उत्पन्न वाढणार**

केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या अधिनस्त विदेशी व्यापार महासंचालक संतोष कुमार यांनी अधिसूचना जारी करून कांद्याच्या निर्यातीवर लावण्यात आलेले किमान निर्यात मूल्य तात्काळ प्रभावाने पुढील आदेशापर्यंत रद्द केले आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा चांगला भाव मिळेल, असा विश्वास ना.विखे पाटील यांनी व्यक्त केला. यापूर्वी काद्यावर ५५० डॉलर प्रति टन एमईपी आकरली जात होती.

बासमती तांदळाची निर्यात वाढेल सोबतच केंद्र सरकारने बासमती तांदळावर लावलेला ९५० डॉलर प्रती टन निर्यात मूल्य देखील रद्द केला आहे. यामुळे विदर्भातील बासमती तांदूळ उत्पादकांना त्यांचा तांदूळ थेट विदेशी बाजारात विक्रीसाठी पाठविता येणार आहे. शेतकऱ्यांकडून बासमती तांदळाची निर्यात वाढणार असून धान उत्पादकांच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल असेही ना.विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

# प्रथमस्तरीय तपासणीत ३९९ मतदान यंत्रात बिघाड

मतदान यंत्रे नाशिकला रवाना होणार

नगर : प्रतिनिधी



**आगामी विधानसभा निवडणुकीसाठी एमआयडीसीतील वखार महामंडळात झालेल्या प्रथमस्तरीय तपासणीत ३९९ मतदान यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड आढळून आला होता. दोष आढळलेले मतदान यंत्रे आता नाशिकला रवाना करण्यात येणार आहे.**

विधानसभा निवडणुकीसाठी १ ते ३० ऑगस्ट दरम्यान मतदान यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी पार पडली. नगरजिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघासाठी १८४९५ मतदान यंत्रांची आवश्यकता आहे. यात बॅलेट युनिट ८५५०, कंट्रोल युनिट ४७८२ आणि व्हीव्हीपॅट ५१६३ अशा यंत्रांचा समावेश आहे. कमी पडलेली मतदान यंत्रे बीड, जालना येथून मागवण्यात आले आहे. जिल्ह्यात १२ विधानसभा मतदारसंघासाठी ३७६३ मतदान केंद्र राहणार आहेत. यातील प्रत्येक मतदान केंद्रावर प्रत्येकी एक केंद्र अध्यक्ष, तीन पोलिंग ऑफिसर्स आणि एक शिपाई, अशा पाच अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे.

# लष्करात भरतीचे आमिष दाखवून फसवणूक करणारा जेरबंद

बनावट ट्रेनिंग कॅम्प उभारून बनावट भरती

नगर : प्रतिनिधी



**लष्करात भरती करून देतो असे सांगत तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीला भिंगार कॅम्प पोलिसांनी जेरबंद केले. सत्यजित भरत कांबळे (रा. श्रीगोंदा, जि. नगर) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. तो लष्करी अधिकारी असल्याचे सांगत युवकांना लष्करात नोकरी लावण्याचे आमिष दाखवत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. भिंगार कॅम्प पोलिसांच्या मदतीने पुण्याच्य मिलिटरी इंटेलिजन्स दक्षिण कमानने ही कारवाई केली.**

नगर शहर व परिसरात भारतीय लष्कराच्या संस्था आहेत. तसेच छावणी मंडळही आहे. अशा संस्थांत युवकांना नोकरी मिळवून देतो. असे सांगत फसवणूक करणारी टोळी भिंगार कॅम्प पोलिसांच्या गळाला लागली आहे. या टोळीतील एका आरोपीला आज पोलिसांनी जेरबंद केले. महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरीयाणा व नवी दिल्ली येथील शंभरहून अधिक युवकांना लष्करात भरतीचे आमिष दाखविण्यात येत होते. त्यासाठी देहरादून व नगर जिल्ह्यात बनावट ट्रेनिंग कॅम्प उभारून बनावट भरती केली जात होते.

नगर शहरातील सैन्य क्षेत्र असलेल्या जामखेड रस्त्यावरील मुठी चौकात ६ फेब्रुवारी ते २८ मे २०२२ या कालावधीत हा प्रकार घडला. नाशिक जिल्ह्यातील पास्ते गावच्या भगवान काशिनाथ घुगे व हजारो युवकांना सत्यजित कांबळे, बापू छबु आव्हाड (रा. आंबेगाव, ता. येवला, जि. नाशिक), राहुल सुमंत गुरव (रा. चौसाळा, जि. बीड) या तीन आरोपींनी सैन्यात मेजर पदावर नोकरीला असल्याचे भासवून नोकरी देण्याचे आमिष दाखवत फसवणूक केल्याचे समोर आले. याची माहितीनुसार भिंगार कॅम्प पोलीस व पुण्याच्या मिलिटरी इंटेलिजन्स दक्षिण कमानच्या पथकाने कारवाई करण्यासाठी निघाले.

सत्यजित कांबळे दिल्ली येथे राहत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथक दिल्लीत शोध घेत होते. पथक दिल्लीत आल्याचे कळताच आरोपी कांबळेने महाराष्ट्रात पलायन केले. पथकाने त्याचा शोध घेत बेलापूर (ता. श्रीरामपूर) येथे सापळा रचून त्याला शिताफीने पकडले. त्याने पथकाकडे इतर साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. यामध्ये एक महिला दलालही सामिल असल्याचा संशय पथकाला आहे. ही टोळी प्रत्येक युवकाकडून सुमारे सात ते आठ लाख रुपये उकळत असल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले आहे. सत्यजित कांबळे याच्या साथीदारांचा तपास पथक करत आहे.

**अशी करत होते फसवणूक पद्धत**

आरोपी हे सैन्य भरती प्रक्रिया सुरू होण्या पूर्वी प्रशिक्षण केंद्रात संपर्क साधून युवकांना गळाला लावायचे. देशातील विविध राज्यातील भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये संपर्क करुन युवकांना देहरादून व नगर येथील सैन्य परिसरात बोलावले जायचे. युवकांना प्रशिक्षण देऊन व पैसे देण्याऱ्या उमेदवारांना सेना दलातील मुख्य अभियंता अधिकारी आणि सेवानिवृत्त दक्षिणी कमान मुख्यअधिकारी यांच्या नावाने बनावट नियुक्ती पत्र दिली जायची. युवकांची खात्री पटावी यासाठी त्यांनी जंगली भागात बनावट प्रशिक्षण शिबिरे घेतली जात होती, असे पोलीस तपासात समोर आले आहे.

# ईद-ए-मिलाद

इस्लाम धर्मात पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मदिवसाला मोठं महत्व आहे. पैगंबर हजरत मोहम्मद यांचा जन्मदिन 'ईद मिलाद उन-नबी' म्हणून साजरा करण्यात येतो. ईद मिलाद उन-नबीच्या दिवशी घरं आणि धार्मिक ठिकाणं आकर्षक रोषणाईने सजवले जातात, प्रार्थना केली जाते. ठिकठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. या दिवशी हजरत मोहम्मद यांच्या पवित्र वचनांचं, कुराणाचं पठण केलं जातं.



इस्लाम धर्मात दान करण्याला मोठं महत्व आहे. ईद-ए-मिलाद-उन-नबी च्या निमित्ताने गरिबांमध्ये अन्नदान केलं जातं. ईद-ए-मिलाद-उन-नबीचा आजचा दिवस हा मालविद या नावानेही ओळखला जातो. इस्लामिक कॅलेंन्डरनुसार, ईद-ए-मिलाद-उन-नबी सण तिसऱ्या महिन्यात साजरा केला जातो. हा सण भारत, पाकिस्तान, बांग्लादेश तसेच जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सुन्नी आणि शिया हे दोन पंथ वेगवेगळ्या दिवशी ईद-ए-मिलाद-उन-नबी हा सण साजरा करतात.

**ईद-ए-मिलाद-उन-नबी चा इतिहास**

इस्लाम कॅलेन्डरच्या तिसऱ्या महिन्यातील १२ तारखेला, इसवी सन पूर्व ५७१ मध्ये पैगंबर हजरत मोहम्मद यांचा जन्म झाला होता. सर्वात आधी हा सण इस्त्रायलमध्ये साजरा करण्यात येत होता. त्यानंतर अकराव्या शतकापासून जगभरात हा सण साजरा करण्यात येऊ लागला. असे म्हणतात की मोहम्मद साहेब ६ वर्षांचे होते तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले होते. त्यानंतर त्यांचे अबू तालिब आणि आजोबा अबू मुतालिब यांनी प्रेषित मुहम्मद यांना वाढवले. अल्लाहने सर्वप्रथम प्रेषित मुहम्मद यांना कुराण दिले, अशी इस्लामची श्रद्धा आहे. ज्यानंतर प्रेषित मोहम्मद यांनी पवित्र कुराणचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला.

**ईद-ए-मिलाद-उन-नबी चे महत्व**


या दिवशी रात्रभर अल्लाहचे पठण केले जाते. पवित्र कुराण घरे आणि मशिदींमध्ये वाचले जाते. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या निमित्ताने सर्वत्र मिरवणुका काढण्यात येतात. मशिदीमध्ये नमाज पडण्यात येतात, त्याचवेळी पैगंबरांचा संदेशाचा सर्वत्र प्रसार करण्यात येतो. आजच्या दिवशी गरिबांमध्ये अन्नाचे दान केलं जातं.

**असा सण साजरा करतात**

ईद मिलाद उन नबीच्या दिवशी प्रार्थना आणि संदेश वाचण्याबरोबरच गरीबांना देणगी देखील दिली जाते. त्यांना जेवण दिले जाते. या दिवशी जे लोक मशिदीत जाऊ शकत नाहीत, ते त्यांच्या घरी कुराण पठण करतात. इस्लाममध्ये असा विश्वास आहे की ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या दिवशी कुराण पठण केल्याने अल्लाहची दया येते.

## वाचकांच्या लेखणीतून

# नज़दीक आते आते...



कचरावेचक महिलेवर दिवसाढवळ्या बलात्कार. उज्जैन मधील घटना. बघे बनवत राहिले व्हिडीओ. अशी एक खळबळजनक वृत्तपत्रीय बातमी वाचनात आली. तशा बलात्काराच्या बातम्या दररोज वृत्तपत्रात वाचायला मिळतातच. निर्भयाची घ्या, कलकत्त्याच्या महिला डॉक्टरची घ्या, किंवा बदलापूरच्या दोन चिमुरड्या मुलींवर झालेल्या अत्याचाराची दुर्दैवी घटना घ्या! म्हणून त्यांचे गांभीर्य कमी होते असे नाही.

समाजात आजुबाजूला घडणाऱ्या घटनांचा वा दृष्यांचा व्हिडीओ काढणे तसे काही वाईट नाही. पण समोरील दृष्य कोणते आहे त्याचा आपण सारासार विचार करायला नको का? पाण्यात बुडणाऱ्याला वाचवायचे सोडून त्याचा व्हिडीओ काढीत बसणे कितपत उचित आहे? तद्वत समोर महिलेवर बलात्कार होत असताना सभोवतीच्या लोकांनी संकटग्रस्त महिलेचा व्हिडीओ काढीत बसणे, यात समाज मानसिक साफल्य मानतो. हे सर्वथा चूक आणि चूकच आहे. निषेधार्हसुद्धा आहे.

विज्ञानामुळे आपण फार जवळ आलो. कर लो दुनिया मुट्ठी में म्हणत होतो. पण अशा दुर्दैवी घटना वाचून वाटते आपण इतके संवेदनाहीन कसे झालो? विज्ञानामुळे आम्ही जवळ येता येता एकमेकांपासून फार दूर होत गेलो!

नज़दीक आते आते
बहुत दूर निकल गये!

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### कांद्याबाबत केंद्राचा निर्णय दिलासा देणारा

करण्यात आली आहे. यामुळे देशातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सोयाबीनच्या किंमती वाढून शेतकऱ्यांना चांगला दर मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंबंधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चार दिवसांपूर्वीच मंत्रालयातील त्यांच्या दालनात विशेष बैठक घेतली होती. कांदा, सोयाबीन आणि बासमती तांदळाच्या प्रश्नासंबधी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यादृष्टीने कार्यवाही सुरु करण्यात आली होती. केंद्र सरकारने कांदा आणि बासमती तांदळावरील निर्यात मूल्य हटवावे तसेच खाद्य तेलाच्या आयात शुल्कात वाढ करण्याची आग्रही मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याकडे केली होती. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला होता.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मागणीला यश आले आहे. केंद्राने घेतलेल्या या निर्णयाचा देशातल्या कांदा, बासमती तांदूळ आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. शेतकरी हिताच्या या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यासह वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांचे आभार मानले आहेत.






# चेडे यांच्या निवेदनानंतर विसर्जन बारवेची सफाई

## विशाल शिंदे यांचाही पाठपुरावा

पारनेर : प्रतिनिधी

**मंगळवारी पार पडणाऱ्या गणपती विसर्जनासाठी शहरातील बारवेची सफाई करण्याच्या मागणीचे निवेदन नगरसेवक अशोक चेडे यांनी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांना सादर केल्यानंतर निवेदनाची दखल घेउन वरची वेस परिसरातील बारवेची सफाई करण्यात आली. मा. नगरसेवक विशाल शिंदे यांनीही याच मागणीसाठी नगरपंचायतीकडे पाठपुरावा केला होता.**

शहरातील वरची वेस परीसरातील पुरातन बारवेमध्ये सार्वजनिक तसेच घरगुती गणपती मुर्तींचे विसर्जन करण्यात येते. गेल्या दोन वर्षात या बारवेमध्ये गणपती विसर्जन करण्यात आल्यानंतर बारवेची सफाई करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे बारवेत मोठया प्रमाणावर शाडू तसेच प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा खच साचून पाणी दुषित झालेले आहे. या दुषित पाण्याची दुर्गंधी सुटली असून परिसरातील नागरीकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.

गणपती विसर्जन हा नागरीकांच्या धार्मिक भावनांचा विषय असून अशा



नगरसेवक अशोक चेडे तसेच विशाल शिंदे यांच्या मागणीनंतर विसर्जन बारवेची सफाई करण्यात आली.

दुर्गंधीयुक्त पाण्यामध्ये गणेश विसर्जन करणे योग्य नसल्याची भूमिका अशोक चेडे व विशाल शिंदे यांनी घेऊन त्यासंदर्भात मुख्याधिकारी विनय शिपाई यांची भेट घेत

### बारवेमध्ये आंदोलनाचा इशारा

**गणेश भक्तांच्या भावनांचा आदर करून बारवेची सफाई न झाल्यास बारवेमध्ये आंदोलन करण्याचा इशारा अशोक चेडे यांनी निवेदनाद्वारे दिला होता. अशुध्द पाण्यामध्ये गणेश विसर्जन होऊ देणार नाही अशी भूमिकाही चेडे यांनी घेतली होती.**

या बारवेची सफाई करण्याची मागणी केली. तसेच निवेदनही मुख्याधिकारी शिपाई यांना सादर करण्यात आले होते.

चेडे व शिंदे यांच्या निवेदनाची दखल घेत नगरपंचायत प्रशासनाने पोकलेनच्या मदतीने बारवेमधील साचलेला गाळ बाहेर काढून दुषीत पाणीही बाहेर काढले. नगरपंचायत प्रशासनाने चेडे व शिंदे यांच्या मागणीची दखल घेउन बारवेची स्वच्छता केल्याबद्दल गणेश भक्तांकडून नगरपंचायत प्रशासनास धन्यवाद देण्यात येत आहेत.

# श्री मुलिकादेवी विद्यालयास क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद

## १४ वर्षे वयोगटातील तालुकास्तरीय स्पर्धा

निघोज : प्रतिनिधी

**नगर येथील जिल्हा क्रिडा कार्यालयाच्या वतीने पारनेर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत १४ वर्षे वयोगटामध्ये निघोजच्या श्री मुलिकादेवी विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकाविले.**

तालुका पातळीवर विजय संपादन केल्यानंतर या संघाची आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कोकमठाण, कोपगांव येथे पार पडणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेत श्री मुलिकादेवी विद्यालयाचा संघ पारनेर तालुक्याचे नेतृत्व करणार आहे. या संघातील अनुज भोसले, सर्वम अल्हाट, फरहान तांबोळी, सार्थक खामकर, स्वराज लंके, आदित्य वरखडे, वेदांत काकडे, कृष्णा इरोळे, गौरव कवाद, संग्राम लंके, सार्थक लामखडे, जय कोरडे, सोहम काळे, अंशा थोरात या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करीत विद्यालयास यश मिळवून दिले.

विजेत्या संघाचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव विश्वासराव आठरे, ज्येष्ठ विश्वस्त मा. आ. नंदकुमार झावरे, सीताराम खिलारी यांनी अभिनंदन केले. विद्यालयाचे प्राचार्य के बी शिंदे



तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत श्री मुलिकादेवी विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकाविले.

### ए के ४७ मध्ये सराव

**ग्रामीण भागातील मुलांना क्रिकेटचे दर्जेदार पशिक्षण मिळावे यासाठी ए के ४७ स्पॉट या क्लबची सहा महिन्यांपूर्वी निघोजमध्ये स्थापना करण्यात आली आहे. आदेश कोरडे यांच्या या क्लबमध्ये श्री मुलिकादेवी विद्यालयाच्या संघातील खेळाडूंनी सहा महिन्यांपासून सराव केला होता. याच सरावाचा फायदा तालुकास्तरीय स्पर्धेसाठी झाला. विजयी संघाचे संचालक आदेश कोरडे यांनी अभिनंदन केले.**

यांच्यासह सर्व शिक्षकांनीही खेळाडूंचे कौतुक करीत त्यांना जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. क्रिडा शिक्षक बी एम शिंदे, इनामदार, गुंजाळ, बारामते, गोरखे, आवारी, वराळ, पोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# खंडाळा येथे महारूद्राभिषेकाचे आयोजन

## शिवानंद स्वामी शिवानंद दादाजी प्रकटदिनाचे औचित्य

पळवे खुर्द : प्रतिनिधी

**आद्य स्वामी शिवानंद दादाजी यांच्या प्रकटदिनाचे औचित्य साधून खंडाळा येथील दादाजींच्या दरबारामध्ये महारूद्रयाग, महारूद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सुदाम दरेकर यांनी दिली.**



रविवार दि.१५ ते १७ सप्टेंबर दरम्यान पार पडणाऱ्या सोहळयामध्ये रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आल्याचे ओम विश्वात्मक शिवानंद दादाजी ट्रस्टचे सल्लागार तथा शिवसेना नेते संदेश कार्ले यांनी सांगितले.

रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी महारूद्रयागाचे आयोजन करण्यात आले असून सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी ध्यान योग साधना शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१७ सप्टेंबर रोजी आद्य स्वामी शिवानंद दादाजी प्रकट दिन सोहळा, रक्तदान शिबिर तसेच अल्पदरात चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तीनही दिवस स्वामींचे ज्ञानदान, हवन, महाप्रसाद, सत्संग व सांस्कृतीक कार्यक्रम पार पडणार आहेत. श्री दादाजींच्या गुरूपरंपरेतील आद्य स्वामी शिवानंद दादाजी हे संपूर्ण भारत भ्रमण करून दादाजींच्या नामाचा व सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करत आहेत. शिवानंद दादाजी यांनी अखंड ४८ वर्षे खडतर ध्यान योग साधनेद्वारे आणि यज्ञाद्वारे अमोल तपाची प्राप्त करून साधकांना दिव्य अध्यात्मिक शक्ती प्रदान करतात. स्वामी शिवानंद दादाजी यांनी साधनेद्वारे साधकांची कुंडलीनीशक्ती जागृती, सप्तचक्र छेदन, ध्यान योग साधना, आत्मसाक्षात्कार आणि तृतीय नेत्र जागृती प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करतात. साधनेद्वारे साधकांना दिव्य स्वरूपाचे अनुभव येत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र व भारतभर दादाजींचा मोठा भक्त परिवार आणि दरबार आहेत. आद्य स्वामी शिवानंद दादाजी दरबार, खंडाळा येथे होणाऱ्या कार्यक्रमांचा दादाजी परिवारातील भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन खंडाळा दरबाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# तालुका बुद्धिबळ स्पर्धेत मुलिकादेवी विद्यालयाची बाजी

## विविध गटात श्रेयस गुंड,प्रेमराज खराडे प्रथम




निघोज : प्रतिनिधी

**न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज पारनेर येथे छत्रपती शाहू महाराज सभागृहात बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन केले होते या क्रीडा स्पर्धेत श्री मुलिकादेवी विद्यालयातील खेळाडूंनी बाजी मारली.**

या स्पर्धेत ७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.त्यामध्ये १७ वर्षे वयोगटात श्रेयश नवनाथ गुंड हा विद्यार्थी तालुक्यात प्रथम आला असून १४ वर्षे वयोगटात प्रेमराज विशाल खराडे सर्वाधिक गुणांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे या दोन्ही खेळाडूंची संजीवनी इंटरनॅशनल स्कूल शिर्डी या ठिकाणी जिल्हा पातळीवर निवड झाली आहे.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे, सचिव विश्वासराव आठरे ज्येष्ठ विश्वस्त मा.आ.नंदकुमार झावरे , सिताराम खिलारी त्याचबरोबर विद्यालयाचे प्राचार्य के .बी शिंदे व सर्व शिक्षक वृंद आणि निघोज ग्रामस्थांनी या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा शिक्षक बी.एम. शिंदे, सर्वश्री गुंजाळ, आवारी, इनामदार ,बारामते, गोरखे ,श्रीमती पुष्पा वराळ , श्रीमती पोटे मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

# गणेश मंडळांनी लोकाभिमुख कामे करण्याची गरज

- खंडोबा देवस्थान ट्रस्ट व गणेश मंडळाचे सामाजिक उपक्रम कौतुकास्पद
- पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांचे गौरोद्गार

निघोज : प्रतिनिधी

**माजी सरपंच व खंडोबा देवस्थान ट्रस्टचे मार्गदर्शक ठकारामशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्ट व जय मल्हार गणेश मंडळाचे सामाजिक व धार्मिक उपक्रम कौतुकास्पद असून गणेश मंडळाने सामाजिक उपक्रम राबवित लोकाभिमुख कामे करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी व्यक्त केले.**

निघोज येथील खंडोबा मंदिराला भेट देत त्यांनी जय मल्हार गणेश मंडळाचे दर्शन घेतले यावेळी त्यांचा माजी सरपंच ठकारामशेठ लंके व खंडोबा देवाचे पुजारी व व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी दत्तात्रय लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



निघोज येथील जय मल्हार गणेश मंडळाला पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी माजी सरपंच व मार्गदर्शक ठकारामशेठ लंके व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे, हेडकॉन्स्टेबल शिवाजीराव कडूस, गणेश डहाळे, जय मल्हार गणेश मंडळाचे अध्यक्ष अनंथा लंके, उपाध्यक्ष दिलीप लंके, खंडोबा देवस्थानचे विश्वस्त योगेश लंके, गणेश लंके, दत्ता लंके, संदीप लंके, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी दिगंबर डावरे, मार्गदर्शक रामचंद्र वरखडे गुरुजी, शंकरराव लंके, जयसिंग लंके, रुपेश लंके , सचिन लंके, संदीप लंके आदी तसेच मंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी दत्तात्रय लंके यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी देवस्थान ट्रस्टचे सचिव सचिन लंके यांनी आभार मानले.

# प्रा. विशाल रोकडे यांना राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान

## शैक्षणिक व संशोधकीय कार्याची दखल

अळकुटी : प्रतिनिधी

**लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथील इतिहास विभागातील सहा. प्राध्यापक विशाल सुगंधा रामदास रोकडे यांना त्यांच्या शैक्षणिक व संशोधकीय कार्यासाठी जागतिक मानवता आयोग, अमेरिका यांच्यावतीने राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, नीती आयोग महाराष्ट्र तथा एनईपी २०२० चे सदस्य



महेश डाबक यांच्या हस्ते नाशिक येथे प्रा. रोकडे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. जागतिक मानवता आयोग, अमेरिका ही संस्था सामाजिक कार्यात अग्रगण्य व नामांकित संस्था म्हणून जगभरात परिचित आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना या संस्थेकडून पुरस्काराने गौरविण्यात येते.

प्रा. विशाल रोकडे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अळकुटी, माध्यमिक व कनिष्ठ पातळीवरील शिक्षण श्री साईनाथ हायस्कूल अळकुटी पदवीचे शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी तर पदव्युत्तर आणि संशोधकीय शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे झाले आहे. त्यांनी आतापर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील २२ संशोधन पेपर प्रकाशित केले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे त्यांनी पेपर सेटर, पेपर चेकर, भरारी पथक आदी समित्यांवरही काम केले आहे. त्यांचे एम.फिल.चे संशोधन कार्य पूर्ण झाले असून पीएच.डी.चे संशोधन कार्य सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सुरु आहे.

प्रा. विशाल रोकडे यांच्या या यशाबद्दल प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे महसूल तथा पशु व दुग्धव्यवसाय विकास मंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, मा. खासदार सुजय विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, सेक्रेटरी भारत घोगरे पाटील, प्रवरा शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य तसेच सर्व कर्मचारी वृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उत्तम रोहोकले यांचे निधन

भाळवणी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील रहिवासी व सेवानिवृत्त मेजर उत्तम रामचंद्र रोहोकले यांचे अल्प आजाराने नुकतेच निधन झाले.**

सन १९६२ मध्ये ते भारतीय सेनेत दाखल होऊन १५ वर्षे त्यांनी



देशसेवा केली. तर सेवानिवृत्तीनंतर सुमारे २२ वर्षे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळात बस चालक म्हणून पारनेर, श्रीगोंदा, अहमदनगर आगारात सेवा केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त सैनिक संतोष रोहोकले यांचे ते वडील होत.

# उपायुक्तांसह अधिकाऱ्यांची अभ्यासिकेला सदिच्छा भेट

## स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

निघोज : प्रतिनिधी

**औरंगाबाद महानगरपालिकेचे उपायुक्त म्हणून नुकतेच रुजू झालेले गौरवकुमार वसंत वांढेकर तसेच बारामती येथील उपजिल्हाधिकारी महेश हरिश्चंद्रे, शिरुर कासारचे नायब तहसीलदार गौरव दळवी, करंजी येथील मंडल कृषी अधिकारी संकेत कराळे यांनी नुकतीच निघोज येथील शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिकेला सदिच्छा भेट देऊन या ठिकाणी स्पर्धा परीक्षा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

यावेळी मळगंगा यात्रा उत्सव समिती अध्यक्ष शिवाजीराव लंके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, प्रगतीशील शेतकरी उत्तम लामखडे, प्रसिद्ध आर्कीटेक्चर वसंतराव वांढेकर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे, अॅड. ज्ञानेश्वर लामखडे आदी उपस्थित होते. यावेळी या मान्यवरांचा ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

औरंगाबाद महानगरपालिकेचे उपायुक्त गौरवकुमार वांढेकर यावेळी म्हणाले पारनेर तालुका गुणवंतांची भुमी म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. तालुक्यातील स्पर्धा परीक्षा अभ्यास करण्यासाठी बहुतांश ठिकाणी अभ्यासिका देऊन खासदार नीलेश लंके यांनी राज्य सरकारच्या वतीने चांगले काम केले आहे. निघोज येथील



शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून गेली दहा ते पंधरा वर्षात निघोज आणि परिसरातील शैक्षणिक चित्र मोठ्या प्रमाणात बदलले असून शेकडो विद्यार्थी स्पर्धा परीक्षा माध्यमातून अधिकारी झाले आहेत. प्रत्येक वेळी निघोजला आल्यानंतर या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी यावेळी सांगितले औरंगाबाद महानगरपालिकेचे उपायुक्त म्हणून गौरवकुमार वांढेकर हे रुजू झाले ही बाब तालूक्यासाठी अतिशय अभिमानास्पद असून आपल्या तालुक्यातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्च अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवीत आहेत ही तालुक्यातील जनतेसाठी अभिमानाची बाब आहे. वांढेकर यांनी प्रशिक्षण सुरू असताना सुद्धा अधिकाऱ्यांना या ठिकाणी आणत गावचा नावलौकिक राज्यात केला आहे. आज सुद्धा त्यांनी अधिकारी मित्रांना या ठिकाणी आणून येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे.

खासदार नीलेश लंके यांनी या ठिकाणी दोन वर्षांपूर्वी शरदचंद्रजी पवार साहेब ही अभ्यासिका देऊन स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना शैक्षणिक चालना देण्याचे काम केले आहे. या इमारतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संकुल म्हणून होणार असून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज व मुंबईकर मंडळ यांनी जवळपास दहा लाख रूपयांचे साहित्य लोकसहभागातून दिले आहे. खासदार नीलेश लंके यांनी दिड कोटी रुपयांचा निधी या इमारतीसाठी उपलब्ध करून दिला असून अत्यंत अद्ययावत झालेली ही इमारत म्हणजे एक मोठे शैक्षणिक संकुल असल्याचे प्रतिपादन लंके यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त अॅड. ज्ञानेश्वर लामखडे यांनी केले शेवटी विश्वस्त बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com